# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नेहरू नगर झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. २६ संघर्ष
**{सा.बां.वि. झोन क्र. ०५}** नगर नाल्याची सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव मुळ प्राकलनिय रक्कम रू. २,२५,१५,७३०/- आहे. कामास पद क्र. A२८८०१३३२२०३ अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2025-26 मध्ये रु. २,२५,१५,७३०/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदरहू प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच रितसर निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1. सदरहू कामाला मा. मुख्य अभियंता (सा.बां.वि.) यांच्याव्दारे तांत्रीक मान्यता क्र. CE/PWD/T.S/09/25-26 दि. 29/04/2025 नुसार रु. २,२३,२९,७६०/- च्या राशीला तांत्रीक मान्यता प्राप्त आहे.
२. सदर कामाचे खर्चास्तव प्रावधान आय व्यय पद. क्र. (A२८८०१३३२२०३) मध्ये प्रावधान उपलब्ध आहे.
३. इतर सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 52/**स्थायी समिति/प्रशासक** **दिनांक :-** 19/05/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नेहरुनगर झोन क्र. ०५ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नेहरू नगर झोन क्र. 5 अंतर्गत प्रभाग क्र. २६ संघर्ष नगर नाल्याची सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव मुळ प्राकलनिय रक्कम रू. २,२५,१५,७३०/- आहे. कामास पद क्र. A२८८०१३३२२०३ अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2025-26 मध्ये रु. २,२५,१५,७३०/- चे प्रावधान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. करीता सदरहू प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच रितसर निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**